प्रकरण दुसरे

# म.द. हातकणंगलेकर व्यक्ती आणि वाङ्मय व 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहाची प्रयोगशीलता

पान क्र. २७ ते ५८

प्रकरण दुसरे

# म. द. हातकणंगलेकर व्यक्ती आणि वाङ्मय व 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहाची प्रयोगशीलता

२.१ प्रास्ताविक

२.२ म. द. हातकणंगलेकर : व्यक्ती परिचय

२.३ म. द. हातकणंगलेकर : वाङ्मयीन परिचय

२.४ 'उघडझाप' ग्रंथाची प्रयोगशीलता

२.५ 'उघडझाप' मधील व्यक्तिदर्शन व प्रवृत्तीदर्शन

२.६ निष्कर्ष

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण – दुसरे

# म.द. हातकणंगलेकर व्यक्ती आणि वाङ्मय व 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहाची प्रयोगशीलता

## २.१ प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणामध्ये आपण मराठीतील 'चरित्र-आत्मचरित्र', 'आत्मकथने' या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व त्यांची वाटचाल पाहिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठीतील ज्येष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकर यांचे व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कार्य, तसेच प्रस्तुत लघुप्रबंधासाठी निवडलेला त्यांचा 'उघडझाप' हा आत्मपर आठवणींचा संग्रह आणि या संग्रहाची प्रयोगशीलता आपणास तपासायची आहे.

म.द. हातकणंगलेकर हे एक सुजाण, समतोल व सहृदय आस्वादक समीक्षक म्हणून समस्त मराठी वाचकवर्गास सुपरीचित आहेत. ते इंग्रजी भाषेचे एक नामवंत व निष्णांत प्राध्यापक म्हणून ओळखले जात. तसेच मराठी साहित्यविचारामध्ये त्यांचे विचार साहित्याच्या अभ्यासकांना मौलिक वाटत आलेले आहेत. ग्रामीण, शहरी अशा सर्वच क्षेत्रातील नव्या जुन्या वाङ्मयाचे आस्वादक आणि मूल्यशोधन या गोष्टी त्यांच्या सततच्या चिंतनातील भाग आहेत. मराठीतील एक महत्त्वाचे कथाकार जी.ए. कुलकर्णी यांच्यापासून ते अलिकडील नव्याने लिहिणाऱ्या लेखकांपर्यंत त्यांनी अतिशय मूलग्राही आस्वादकांच्या दृष्टिने त्यांनी पाहिले आहे. प्रा. म.द. हातकणंगलेकर आणि समकालीन साहित्यिकांचे मैत्र निर्व्याज, निर्मळ आणि निष्कपट आहे. प्रा. म. द. हातकणंगलेकरांमधील मर्मज्ञ समीक्षकाबद्दल समकालीनांना स्नेहशीलता आणि आदरभाव आहे. त्यांच्या समीक्षालेखनाची शैली एखाद्या दर्जेदार ललित लेखकाच्या लेखन शैलीहून कमी नाही, असे म्हणावेसे वाटते. या त्यांच्या कार्याचा गौरव करताना प्रा. अविनाश सप्रे म्हणतात, "सरांनी केवळ समीक्षाच केली नाही तर मराठी भाषासंस्कृती पुढे नेण्यासाठी जो दृष्टिकोन ठेवला,उदारता, व्यापकता दाखविली त्यामुळे नव्या प्रवाहाची पाठराखण केली गेली. सर्व प्रवाहांना त्यांनी सतत बरोबर घेतले आहे." [१] म.द. हातकणंगलेकर हे स्वागतशील व आशावादी समीक्षक आहेत. त्यामुळेच कितीतरी तरूण लेखकांना ते आपला आधार वाटतात.

म. द. हातकणंगलेकर यांचा लोकसंग्रह मोठा आहे. यामध्ये प्रामुख्याने साहित्यिक क्षेत्रातील लोकांची अधिक उपस्थिती आहे. तसेच त्यांना भेटलेले आणि त्यांच्या सानिध्यात आलेल्या काही मोजक्या पण वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिंची उपस्थिती ही लक्षणीय दिसून येते.

## २.२ म. द. हातकणंगलेकर : व्यक्ती परिचय

म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या पुस्तकाची प्रयोगशीलता तपासण्याअगोदर म. द. हातकणंगलेकरांचे व्यक्ती आणि वाङ्मय या गोष्टींचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष हा बहुमान ज्यांना मिळाला ते ज्येष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकर यांचे पूर्ण नाव 'मधुकर दत्तात्रेय हातकणंगलेकर' असे आहे. म. द. हातकणंगलेकरांचा जन्म त्यांच्या मूळ गावी, म्हणजे हातकणंगले या तालुक्याच्या गावी १ फेब्रुवारी १९२७ साली झाला. त्यांच्या वडीलांचे पूर्ण नाव दत्तात्रेय खेमराव हातकणंगलेकर, तर आईचे पूर्ण नाव  मथुबाई दत्तात्रेय हातकणंगलेकर असे आहे. तर गुंडोपंत दत्तात्रेय हातकणंगलेकर हे त्यांचे वडीलबंधू होत.

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हातकणंगले, कोल्हापूर व सांगली येथे पूर्ण झाले. १९४४ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या पुढचे शिक्षण त्यांनी 'मुंबई विद्यापीठ मुंबई' या विद्यापीठातून पूर्ण करून 'इंटर आर्टस्' ही पदवी संपादन केली. यापरीक्षेतील यशामुळे ते 'सेल्बी पारितोषिक लॉजिक' चे मानकरी ठरले. म. द. हातकणंगलेकरांचे पुढील महाविद्यालयीन शिक्षण 'मुंबई विद्यापीठातून' इंग्रजी या विषयामधून झाले. बी. ए. च्या पदवीसाठी त्यांना 'एलिस पारितोषिक' मिळाले आहे. त्यापुढील एम. ए. चे शिक्षण त्यांनी 'पुणे विद्यापीठ' येथे पूर्ण केले. ऐन तरूण वयात, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना हातकणंगलेकरांच्या मनावर 'मार्क्सवादाचे' आणि 'रॉयवादाचे' काही संस्कार झालेले होते. मात्र तोच एक वसा घेऊन त्यासाठी आपले सारे जीवन व्यथीत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. प्रा. ए. बी. शहा, प्रा. मे. पुं. रेगे, लक्ष्मणशास्त्री जोशी, गोवर्धन पारीख यांच्या सहवासात त्यांना खरे शिक्षण मिळाले असे वाटते. विशेषत: लक्ष्मणशास्त्री जोशींचा सहवास, म. द. हातकणंगलेकरांना त्यांच्या विचारांच्या चोहोबाजूंनी फिरवून आणणारा, विचारांची पूर्व परंपरा उकलून दाखविणारा, नवविचारांना चालना देणारा असा होता. १९४८ साली बी.ए. ची पदवी प्राप्त केल्यानंतर

तासगाव येथे आपल्या शिक्षकी पेशाला त्यांनी सुरूवात केली. तासगाव येथे तेरा दिवस शिक्षक म्हणून त्यांनी अध्यापनाचे कार्य केले, पण तासगाव येथील भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती व त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी याला कंटाळून त्यांनी त्या नोकरीचा राजीनामा दिला. परत ते सांगली येथे मामांच्या घरी आले. यापुढील काळामध्ये म. द. हातकणंगलेकर यांनी सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या वसतीगृह प्रमुखाचे काम पाहिले. एम.ए. ची पदवी प्राप्त होताच धारवाड येथे त्यांनी प्राध्यापक म्हणून काही काळ वास्तव्य केले. यानंतरच्या काळात म्हणजे १९५६ ते १९८७ अशी जवळ-जवळ तीसएक वर्षे त्यांनी विलिंग्डन महाविद्यालय सांगली येथे इंग्रजी विषयाचे उत्तम अध्यापनाचे कार्य पार पाडले. या काळात शेवटी १९७३ ते १९७८ या कालावधीत त्यांनी विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्यपदही भूषविले आहे.

मुळातच म. द. हातकणंगलेकरांचे व्यक्तिमत्व हे गूढ वाटावे असे आहे. याला त्यांचा मितभाषी स्वभाव कारणीभूत असावा. शांत, अबोलपणा, चेहऱ्यावर नेहमी गंभीरता, बोलण्यातील मितभाषीपणा व काहीसा अलिप्तपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्पष्ट जाणवतो. म्हणूनच ते इतरांपेक्षा वेगळ्या व्यक्तिमत्वाचे वाटतात. म.द. हातकणंगलेकर मितभाषी आहेत. स्वत:विषयी ते फारसे बोलत नाहीत. त्यांच्या आयुष्याचे सारे तपशील त्यांच्या मित्रांनाही नीटसे माहीत नाहीत. स्वत: विषयी फार कमी बोलणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वातील वेगळेपण आहे. हातकणंगले सारख्या एका छोट्या खेडेगावात त्यांचे बालपण गेले. गावातील कितीतरी हृद्य घटना, प्रसंग, व्यक्ती त्यांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेलेल्या आहेत. पन्नास वर्षापूर्वीच्या काळात त्या खेडेगावातील शाळेत शिकत असताना आपल्या वर्गमित्रांचे दारिद्रय त्यांनी जवळून पाहिले होते. जातीपातीचे सारे आडसर हे त्यांच्या मनाने एका स्वभावसिद्ध प्रवृत्तीने तेव्हाच ओलांडले होते. स्वत: निधर्मिय आणि उदारमतवादी या भूमिकेने ते जगले. त्यामुळे कोणत्याही थरातील मित्राकडे ते जात-येत असत. यामुळे त्या-त्या मित्राचे घर त्यांच्या दृष्टीस सहजपणे पडत असे. खेडेगावातील सामान्य माणसांचे अज्ञान आणि अर्धपोटी राहून कंठावे लागणारे जीवन या गोष्टी म. द. हातकणंगलेकरांच्या संस्कारशील मनाने त्या वेळीच टिपलेल्या आहेत. त्याच बऱ्याचवेळा 'उघडझाप' मधून पानोपानी व्यक्त होताना दिसतात. यामुळेच लेखक म. द. हातकणंगलेकर आणि व्यक्ती म्हणून म. द. हातकणंगलेकर हे वेगळे नाहीत, असेच जाणवायला लागते. यामुळे

'चित्ते वाचि क्रियायां च महतां एकरूपता।' हे वचन त्यांच्या संदर्भात आपण योजू शकतो. या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी उत्तम कांबळे म्हणतात, ''गेली ५-१० दशकं म. द. कृष्णाकाठी व्रतस्थपणे साहित्यसेवा करीत आले आहेत. त्यांनी लेखकांच्या चार पिढ्या घडविल्या आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व सुशील, सजग, निगर्वी व संयमी आहे.' [२]

खेडेगावात आपले बालपणीचे दिवस व्यथित केल्यानंतर हातकणंगलेकर प्रथम कोल्हापूर व नंतर सांगली येथील शहरी वातावरणात राहिले. पुढे इंग्रजी या विषयामधून बी.ए. त्यानंतर एम.ए. या पदव्या त्यांनी संपादन केल्या. मात्र आपण इंग्रजी शिकलो असलो, इंग्रजी विषयाचे प्राध्यापक असलो तरीही आपली मातृभाषा ही 'मराठी' आहे, आणि त्या भाषेचे व समाजाचे आपण काही देणे लागलो याचे भान त्यांना सदैव असलेले दिसते. इंग्रजीइतकेच त्यांचे मराठीचे वाचन समृद्ध आहे. पण त्याचवेळी इंग्रजी साहित्यापेक्षा मराठीतील साहित्याकडे त्यांचे लक्ष अधिक वेधल्याचे दिसते. म.द. हातकणंगलेकर हे समतोल आणि साक्षेपी समीक्षक म्हणून सर्वांनाच सुपरिचित आहेत. इंग्रजी वाङ्मय व समीक्षा यांचा व्यासंग आणि आधुनिक मराठी साहित्याबद्दलची विलक्षण आत्मियता व विविध साहित्यप्रवाहांची सूक्ष्म जाण याचा प्रत्यय त्यांच्या मर्मग्राही लेखनातून नित्य येत राहतो. खरे म्हणजे म. द. हातकणंगलेकर रूढ अर्थाने टीकाकार नाहीतच, ते आहेत कथेच्या सौंदर्याची लखलखीत अन् लयबद्ध स्पंदने कुठून येत आहेत, याच्या शोधात रंगले-रमलेले आस्वादक सौंदर्यवेधी समीक्षक. मात्र टीका म्हणून बोलायचेच पाहिजे तेव्हा म. द. हातकणंगलेकर बोलायला कमी करत नाहीत. पण तेही ठणठणीतपणे नाही-सूचकपणे ! स्वत: म. द. हातकणंगलेकर एक छुपा पण पूर्णपणे व्यक्त न झालेला ललित आणि लघुकथालेखक असल्याचे जाणवते. अशा स्वभावाच्या म. द. हातकणंगलेकरांनी निखळ ऐहिकापासून प्रारंभ करून, विशुद्ध अध्यात्मापर्यंत जे जे सत्वशील आहे त्याचा आदर केला. त्यामुळे त्यांनी कोणत्याही प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या जागेचा मोह टाळला. त्याचे कारण शांत आणि निर्वेध अशा जीवनाचीच त्यांना सदैव ओढ आहे. त्यांच्या जीवनप्रवासाबरोबर कलावंत समीक्षकाचा प्रवास विकसित होत जातो. महाविद्यालयीन जीवनात त्याला अधिक अवसर मिळतो. प्राध्यापक झाल्यानंतर लेखन, वाचन आणि चिंतन अव्याहतपणे करीत त्यांनी समीक्षक म्हणून आपले स्वत:चे स्थान मराठी साहित्यात निर्माण केले. त्यांच्या समीक्षेत सर्जनशील

कलावंताचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाल्याने ती अभ्यासक व रसिकांना अधिक भावते. विलिंग्डन महाविद्यालयात प्राध्यापकीनंतर यशस्वी प्राचार्य म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्तम प्राध्यापकाचा पुरस्कार मिळाला. मात्र अनेकवेळा कुलगुरूपदाच्या यादीत त्यांचे नाव असूनही त्यांना कुलगुरू होता आले नाही. त्यामध्ये राजकारण चालते याची त्यांना खंत वाटते.

म. द. हातकणंगलेकरांनी सर्वप्रथम 'हे दुःख आणि ते दुःख' (१९५८) या शीर्षकाची समीक्षा नवभारतमध्ये लिहिली. मात्र खऱ्या अर्थाने १९७९ साली प्रसिद्ध झालेला त्यांचा 'विचारधारा' हा संपादित ग्रंथ हाच त्यांच्या समीक्षा लेखनाचा खरा प्रारंभ म्हणावा लागेल. म. द. हातकणंगलेकरांचा समीक्षा, अनुवाद, संपादन, ग्रंथलेखन, ललित लेखन, नियतकालिकेचे संपादन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रवाहाशी संबंध आलेला आहे.

गेले अर्धशतक म. द. हातकणंगलेकरांनी इंग्रजी व मराठी साहित्याचा व्यासंग जोपासलेला दिसून येतो. म.द. हातकणंगलेकर हे 'महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार' समिती, 'ज्ञानपीठाची मराठी उपसमिती', 'महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे,' 'साहित्य संस्कृती मंडळ', 'विश्वकोष निर्मिती मंडळ', 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान', 'कराड साहित्य पुरस्कार समिती', 'साहित्य अकादमी, दिल्ली' इत्यादी वेगवेगळ्या समित्यांवर त्यांनी काम पाहिलेले आहे. अकादमीच्या 'Literary Journal' या इंग्रजी नियतकालिकात सतत दहा वर्षे त्यांनी मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचा परामर्श घेणारे लेखन केलेले आहे. अकादमीच्या 'Makers of Indian Literature' या मालिकेत ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कै. वि.स. खांडेकर यांच्यावर त्यांनी पुस्तक लिहिलेले आहे. पुणे, मुंबई, विदर्भ, मराठवाडा येथील अनेक साहित्य संस्थाशी ते संबंधित राहिलेले आहेत. अनेक नामवंत व नवोदित लेखकांच्या पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या असून, गो.नि. दांडेकर यांच्या 'माचीवरला बुधा', व्यंकटेश माडगूळकर यांचे 'सती' हे नाटक, प्रेमानंद गज्वी यांच्या 'किरवंत' या बहुचर्चित नाट्यकृतीचे कलकत्त्याच्या 'सीगल' या प्रकाशन संस्थेसाठी इंग्रजीत भाषांतर व संपादन त्यांनी केलेले आहे. गेल्या अर्धशतकात मराठी साहित्यात ज्या विविध प्रेरणा व प्रवृत्ती निर्माण होत गेल्या त्यावर त्यांनी मार्मीक लेखन केले आहे. सौंदर्यशास्त्र, समीक्षा, कथा, कादंबरी, ललित लेखन इत्यादी साहित्य प्रकारातील अर्थपूर्ण व अभ्यासक कृतींचा म.द. हातकणंगलेकरांनी सतत व्यासंगपूर्ण शोध घेतला आहे. कसदार लेखन करणाऱ्या

नवोदित लेखकांना प्रकाशनासाठी ते सहाय्यभूत ठरलेले आहेत. अनेक प्रतिभावंत साहित्यिकांचे मैत्र त्यांना लाभलेले आहे. अशा म.द. हातकणंगलेकरांच्या कार्याचा गौरव त्यांना यथोचीत पुरस्काराने सन्मानित करून केलेला आहे.

१९७६ चा महाराष्ट्र शासनाचा 'आदर्श प्राध्यापक' पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशनचा 'ग्रंथ पुरस्कार' त्यांना मिळालेला आहे. याबरोबरच १९८६ साली निवृत्तीनंतर झालेला त्यांचा 'नागरी सत्कार' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते झाला. ७५ व्या वाढदिनादिवशी झालेला 'नागरी सत्कार' मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झाला. तर सांगली येथे २००७ मध्ये भरलेल्या ८१ व्या अखिल भारतीय साहित्य संम्मेलनाचे त्यांना लाभलेले अध्यक्षपद हा त्यांच्या जीवनातील सुवर्णक्षण आहे. असे असताना योग्यता असूनही अनेक मानसन्मानापासून ते वंचीत राहिले ही खंत म.द. हातकणंगलेकर यांच्यावरती निष्कामपणे प्रेम करणाऱ्या अनेक व्यक्तिंच्या मनाला आहे. याविषयी प्रा. तानाजी पाटील म्हणतात, "स्वत: निधर्मी आणि उदारमतवादी या भूमिकेने ते जगले. मात्र भारतासारख्या देशात जातीधर्माचे, राजकारणाचे, वर्चस्व असणाऱ्या समाजात गुणवत्ता असूनही त्यांना अत्युच्च पदावर जाताना न्याय मिळाला नाही. ही बाब अत्यंत चिंतनीय स्वरूपाची आहे. आयुष्यभर व्रतस्थपणे कार्य करणाऱ्या प्रज्ञावान, गुणवान माणसांची केली जाणारी उपेक्षा ही दुर्लक्षित करण्यासारखा नाही." [३]

मराठी समीक्षा क्षेत्रामध्ये महामेरू असणाऱ्या व्यक्तिबद्दल आपले मत व्यक्त करताना वि. रा. करंदीकर म्हणतात, " विचारधन शब्दबद्ध व्हावे असे हे एक शांत, सात्विक, समंजस आणि समतोल व्यक्तिमत्व. जितके खोल चिंतनशील, तितकेच सूक्ष्म संवेदनशील. निर्लिप्त वृत्तीने आणि बुद्धीचे डोळे पूर्ण उघडे ठेवून विचारांची आणि मानवी जीवनाची अनेक दालने धुंडाळत राहणारे व त्यातील सार हस्तगत करण्याचा प्रयत्न करणारे, असे मन ही एक दैवी देणगी म्हणावयास हवी. ती ज्याला लाभली आहे असा शुद्ध मनाचा, सखोल दृष्टीचा, निरहंकारी वृत्तीचा, निरपेक्ष स्नेहभाव जपणारा आणि समाजजीवनाचा विशाल पट एका सावधान अलिप्तते न्याहळत राहणारा कोणीतरी आपल्या शेजारी असणे, त्याचा सहवास मिळत राहणे, हे ही एक भाग्यच असते. म. द. हातकणंगलेकरांच्या निकट वावरणाऱ्या मित्रांना आयुष्यभर ही स्नेहाची सोबत लाभत आली."[४]

## २.३ म. द. हातकणंगलेकर : वाङ्मयीन परिचय

**प्रस्तावना :**

ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांचा व्यक्ती परिचय आपण पाहिला. मराठी साहित्याच्या क्षेत्रात म. द. हातकणंगलेकर हे एक लक्षणीय नाव आहे. याचे कारण त्यांनी मोजकेच पण वेधक असे लेखन केलेले आहे. त्या लेखनातून त्यांच्यामधील एका मर्मग्राही आस्वादक समीक्षकाचे दर्शन घडत राहाते. साहित्य ही भाषेच्या माध्यमातून साकारलेली कला आहे. पण या कलेला मातीचे कण चिकटलेले असतात. म्हणूनच साहित्यात सामाजिकता येत असते. ही समाज मनस्कता कोणत्या साहित्यामधून प्रभावाने अविष्कृत झाली आहे, तिचे श्रेष्ठत्त्व कसे आहे आणि लेखकाने अंत:गुण विशेष त्याच्या व्यवहारी जगण्यासह साहित्यकृतीत कशा शब्दकळेसह उतरवले आहेत. याचे भान जागते ठेऊन त्यांनी आपले समीक्षापर लेखन केलेले दिसून येते. म्हणून त्यांच्या काही ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेल्या समीक्षापर ग्रंथाचे स्वरूप आणि त्याचा परिचय करून घेणे, तसेच 'साहित्यसोबती' यासारख्या त्यांच्या ललितपर ग्रंथाचा परिचय करून घेणे प्रस्तुत लघुप्रबंधाच्या विषयानुरोधाने आवश्यक आहे. यापुढील भागात तसा प्रयत्न केलेला आहे.

**'विचारधारा'**

'विचारधारा' हा म. द. हातकणंगलेकरांनी संपादन केलेला ग्रंथ १९७९ ला प्रकाशित झाला. या पुस्तकामध्ये म. द. हातकणंगलेकरांनी 'प्रभाकर पाध्ये' यांच्या निवडक लेखाचे संपादन करून त्यास विस्तृत अशी प्रस्तावना लिहिली आहे. या पुस्तकामध्ये भारतीय प्रबोधन, मार्क्सवाद आणि कला या विषयासंबंधीत प्रभाकर पाध्येचे १९६९ ते १९७९ या दहा वर्षातल्या कालखंडातील विचार मुख्यत: यामध्ये आढळून येतात. या दहा वर्षाच्या लेखन प्रपंचातून प्रभाकर पाध्ये यांच्या कलाविषयक दृष्टिकोनातून झालेला विकास या पुस्तकाच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी आपणासमोर ठेवलेला आहे. 'विचारधारा'च्या निवेदनात प्रभाकर पाध्ये यांनी म. द. हातकणंगलेकर यांच्याविषयी केलेले उद्गार म. द. हातकणंगलेकरांच्या लेखनाची महती सांगून जातात. ते म्हणतात, ''या पुस्तकाचे संपादन प्रा. म. द. हातकणंगलेकरांसारख्या जोखंदळ विद्यावृत्ती विचारवंताने केले आहे, हे मी या पुस्तकाचे भाग्य

समजतो. म. द. हातकणंगलेकरांच्या प्रस्तावनेने या पुस्तकातील विचारांना जो उठाव मिळेल ते एक आश्वासनच आहे. [५]

या पुस्तकामध्ये भारतीय प्रबोधन, विश्रब्ध शारदा, आगरकरांनी आम्हाला काय दिले? जयप्रकाश नारायण, कार्ल मार्क्स आणि स्वातंत्र्याची संकल्पना, प्रतिभेचा सौंदर्यविष्कार, कलेचा अनुभव, लय आणि लयविशेष असे प्रा. प्रभाकर पाध्ये यांचे नऊ लेख असून शेवटी म. द. हातकणंगलेकर यांनी प्रा. प्रभाकर पाध्ये यांची घेतलेली मुलाखत असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. पुस्तकाचे दोन विभाग पडले आहेत. पहिल्या भागात भारतीय प्रबोधन व प्रबोधनकार या संबंधी पाच लेख आहेत. याबरोबरच साम्यवादाची संकल्पना मांडणारा एक लेख आहे.

दुसऱ्या विभागातील तीन लेखांत पाध्यांचा, सौंदर्य व साहित्यविचार आलेला दिसून येतो. कलेच्या सौंदर्याचे स्वरसरंजनात्मक स्वायत्त स्वरूप सिद्ध करण्यासाठी श्री. पाध्ये यांनी काही जीवनशास्त्रीय व मानसशास्त्रीय पुरावे उभे केल्याचे दिसून येते. मराठी सौंदर्यमीमांसेच्या प्रांतातील हा एक नवीन विचार असल्याचे जाणवते.

संग्रहाच्या अखेरीस श्री. प्रभाकर पाध्ये यांनी म.द. हातकणंगलेकर यांनी घेतलेली मुलाखत दिलेली आहे.

संपादित पुस्तकातील लेखाच्या माध्यमातून रसिक वाचकांना पाध्येंच्या लेखनाची एक नवी ताजी रूची, वक्तृत्वाचे ठळक गुण, स्मृतीचा अपार संचय, भावनासमृद्धीच्या अनेक कळा, अंतरंगाचे ऐश्वर्य, बाह्य लावण्याने वृद्धिंगत करण्याची आस, तत्त्वचिंतनाची धार आणि वृत्तीचा न थकणारा ताजेपणा, या गोष्टींचा अनमोल ठेवा 'विचारधारा' या ग्रंथाद्वारे दिलेला आहे. पाध्येंच्या वैचारिक व भावगर्भ व्यक्तिमत्त्वाचे मराठी साहित्यात जी लक्षणीय भर घातली ती या पुस्तकरूपाने आपणासमोर सादर होण्यास मदत होईल असे वाटते. या 'विचाराधारे'चा समारोप करताना म. द. हातकणंगलेकर प्रा. पाध्ये यांच्या लेखनाविषयी सांगतात, ''पाध्यांच्या लेखनाला एक नवी ताजी रूची आहे.तिच्यात वक्तृत्वाचे ठळक गुण आहेत, स्मृतीचा अपार संचय आहे, भावसमृद्धीच्या अनेक कळा आहेत. अंतरंगाचे ऐश्वर्य बाह्य लावण्याने वृद्धिंगत करण्याची आस आहे. तत्त्व चिंतनाची धार आहे आणि वृत्तीचा न थकणारा ताजेपणा आहे.'' [६]

**'साहित्यातील अधोरेखिते'**

म. द. हातकणंगलेकर यांचा 'साहित्यातील अधोरेखिते' हा समीक्षा ग्रंथ १९८० साली प्रकाशित झालेला आहे. म. द. हातकणंगलेकर यांच्या साहित्यक्षेत्रातील बहुविध कामगिरीमधील समीक्षा हे एक महत्त्वाचे अंग आहे. आपल्या या समीक्षा लेखनविषयी ते स्वत: 'साहित्यातील अधोरेखिते' या त्यांच्याच संपादित केलेल्या ग्रंथात म्हणतात, ''विद्यार्थीदशेत स्फुट लेखन केले, त्यात गडकऱ्यांच्या शैलीवर एक लेख होता. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी १९५६-५७ साली इंदिरा संत व मुक्तिबोध यांच्या काव्याबद्दलचा 'हे दु:ख व ते दु:ख' हा लेख 'नवभारत' मध्ये प्रसिद्ध झाला तो त्यावेळी मित्रांना फार आवडला होता. तेव्हापासून थोडेफार समीक्षणात्मक लेखन करीत आलो आहे.''[७] याचाच अर्थ म. द. हातकणंगलेकर हे गेली अर्धशतक समीक्षा लिहित असलेले दिसून येते. 'साहित्यातील अधोरेखिते' या समीक्षा ग्रंथामध्ये विद्यार्थीदशेपासून ते आजअखेर म.द. हातकणंगलेकरांनी जे समीक्षा लेखन केले आहे त्यापैकी काही महत्त्वाचे लेख या ग्रंथामध्ये संग्रहीत करण्यात आले आहेत. या समीक्षा ग्रंथातून प्रकाशित झालेले लेख याहीपूर्वी वेळोवेळी वर्तमानपत्रे व पत्रिका यामधून प्रकाशित झालेले आहेत. त्यापैकी काही समीक्षालेख या ग्रंथामध्ये संकलीत केलेले आहेत.

म.द. हातकणंगलेकरांच्या या पहिल्याच समीक्षापर ग्रंथातून त्यांचा खोल व्यासंग जाणवतो. पण त्यांचे ऐटबाज पंडिती प्रदर्शन नाही. त्यात ललित लेखकाची तरल संवेदना आहे. पण तिला एकाच बाजूची धार नाही. सामाजिक आणि साहित्य मूल्यांवर इथे पकड आहे. पण त्यामुळे येणारा कडवेपणा नाही. हेच या समीक्षाग्रंथाचे वेगवेगळेपण म्हणावे लागेल. ते त्या त्या लेखकाचा प्रतिभाधर्म बरोबर ओळखून त्यांचे लेखन मनमोकळ्या रसिकतेने समजावून घेतात. त्या लेखकालाही आपल्या लेखामध्ये अंतर्मुख करून घेतात. समीक्षकाला हट्टी चिकित्सेचे समाधान देता देता साहित्याचा शुद्ध आस्वाद ही किती अवघड गोष्ट असू शकते हे ही सौम्यपणे सुचविणारा, साहित्यकलेच्या गुंतागुंतीची प्रचिती वाचकाला देऊन त्याचवेळी त्याची रसिकता सूक्ष्म अन् शहाणी करणारा म. द. हातकणंगलेकर यांचा हा समीक्षाग्रंथ संग्राह्य आहे. अशा या समीक्षेविषयी डॉ. गो. म. पवार म्हणतात, ''म. द. हातकणंगलेकर यांनी वामन मल्हार जोशी यांच्या विवेकशील परंपरेने प्रगल्भ असणारी समीक्षा पुढे नेली आहे. ते केवळ समीक्षकच नाही

तर ललित लेखकही आहेत. त्यांचे आल्हाददायक विचारशील व्यासंगी व्यक्तिमत्त्व मराठी वाङ्मयाला पुढे नेईल अशी खात्री आहे."[८]

**'मराठी कथा – स्वरूप आणि परिसर'**

म. द. हातकणंगलेकर यांचे हे पुस्तक १९८६ साली प्रकाशित झाले. लघुकथा या साहित्यप्रकारासंबंधी हातकणंगलेकर यांनी लिहिलेले छोटे-मोठे लेख या संग्रहात एकत्र केले आहेत. या लेख संग्रहामध्ये लघुकथेच्या स्वरूपाची चर्चा, मराठी लघुकथेच्या विकासाचे टप्पे असे लेख आलेले आहेत. या पुस्तकातील लेखावरून लघुकथेचे मूळ रूप, पाश्चात्य साहित्यातले रूप आणि मराठी रूप यावर प्रकाश पडावा अशी अपेक्षा वाटते. लघुकथेचा परिसर या विषयाची रूपरेषा दाखविणारे हे सुटे-सुटे लेख आहेत. प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ, जी.ए. कुलकर्णी यांच्या कथासाहित्यावरील लेख मराठी कथेच्या विकासाचे काही प्रमाणात दिग्दर्शन करताना दिसून येतात.

हा लेखसंग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील तीन पिढ्यांच्या मराठी कथाकारांनी संपन्न केलेल्या कथेचा मागोवा घेणारा आहे. यामुळे कथा अभ्यासकांना हा लेखसंग्रह महत्त्वाचा वाटतो. साहित्याचे सौंदर्य एकसंघ असले तरी त्याची रूपे बहुविद्य आहेत, अशी त्यांची उदारमतवादी अन् बहुविधतावादी भूमिका या लेखसंग्रहातून दिसून येते.

**'मराठी साहित्य – प्रेरणा व स्वरूप' (१९५०–१९७५)**

म. द. हातकणंगलेकरांचा हा संपादित ग्रंथ १९८६ साली प्रकाशित झालेला आहे. सैध्दांतिक समीक्षापर स्वरूपाच्या या संपादित ग्रंथामध्ये प्रा. म.द. हातकणंगलेकर आणि प्रा. गो. मा. पवार यांनी संयुक्तपणे संपादित केलेला कालानुक्रमे हा पहिलाच ग्रंथ आहे. प्रा. गो.मा.पवार हे शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख असताना पॉप्युलर प्रकाशन या प्रकाशनसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त समकालीन साहित्यावर एक परिसंवाद आयोजित केलेला होता. हा परिसंवाद शिवाजी विद्यापीठात नव्याने सुरू झालेल्या 'मराठी विभागात' संपन्न झालेला होता. या परिसंवादामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका, आत्मचरित्र, ललित गद्य, विनोदी वाङ्मय, लघुनियतकालिक चर्चा, दलित वाङ्मय चर्चा, मराठी वाङ्मयावरील परकीय प्रभाव, समीक्षा विषयी चर्चा अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकाराविषयी वेगवेगळ्या साहित्यिकांनी मांडलेली मते यांचे संपादन या ग्रंथात आहे. संदर्भासहित परिशिष्टाची जोड देऊन

४३४ पृष्ठांचा महत्त्वाच्या संदर्भग्रंथाच्या स्वरूपात हा संपादित ग्रंथ सिद्ध केलेला आहे.

या परिसंवादाचा मुख्य आशय १९५० ते १९७५ या काळातील नवसाहित्याचा डोळस पाठपुरावा घेऊन मराठी साहित्य स्वरूपाचा आणि प्रेरणेचा वेध घेऊन हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. या प्रकाराच्या परिसंवादातील निबंध आणि त्यावरील विविधांगी सविस्तर चर्चा एकत्र करणारा मराठीतील हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. या पुस्तकाच्या संपादनामागील महत्त्वाचा वैचारिक गाभा संपादकांनी उत्साहीत मनाने मांडला आहे. त्याविषयी सुमन बेलवलकर म्हणतात, ''आजपर्यंतचे मराठी साहित्य हे प्राधान्याने मध्यमवर्गाच्या सांस्कृतिक परिघात वावरणारे राहिले होते... उपेक्षित व दलित समाज या परिघाबाहेर होता.... तिच्यात (समीक्षेत) समाजशास्त्रीय विचार आलेला नव्हता. विस्तृत समाजजीवनाची आस्था त्यात प्रकट झालेली नव्हती. ही पारंपरिक कलाजाणीव आणि समीक्षादृष्टी मुळापासून तपासून पाहावी आणि साहित्यव्यवहाराचे निखळ स्वरूप जाणून घ्यावे; अशी प्रेरणा काही नव्या समीक्षकांच्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. तिचा पाठपुरावा करण्याइतका व्यासंग आणि साहित्यनिष्ठा त्यांच्यामध्ये पक्की रूजलेली आहे. याचा पुरावा या परिसंवादात वारंवार मिळत होता. हीच समीक्षामूल्ये प्रा. म. द. हातकणंगलेकरांची असल्यामुळे त्यांनी याचे समाधान व्यक्त करावे हे उघडच आहे.''[१]

**'डोह काळिमा'**

म.द. हातकणंगलेकर यांचा हा संपादित ग्रंथ १९८७ साली प्रकाशित झाला. या संपादित ग्रंथामध्ये म. द. हातकणंगलेकरांनी जी.ए. कुलकर्णी यांच्या पहिल्या चार कथासंग्रहातील निवडक कथांचे संकलन करून हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. जी.एं. चे हे चार कथासंग्रह म्हणजे 'निळासावळा', 'पारवा', 'हिरवेरावे', 'रक्तचंदन' असे आहेत. या चार कथासंग्रहामधून निवडलेल्या कथा म.द. हातकणंगलेकरांनी 'डोह काळिमा' या अन्वर्थक नावाने प्रसिद्ध केलेल्या आहेत. चाळीस पृष्ठांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेत आरंभीच्या जी.एं. च्या एकेक कथेचे विश्लेषण करीत करीत म.द. हातकणंगलेकर जी.एं. च्या कथालेखनाचे विशेष वाचकापुढे ठेवत जातात.

मराठी वाङ्मयात श्रेष्ठ कथालेखक म्हणून जी.ए. कुलकर्णी यांचे स्थान निर्विवाद आहे. असे असतानाही काही लेखकांनी त्यांच्या कथा म्हणजे 'कलात्मकतेचे केवळ अभास असतात' तर गंगाधर गाडगीळ यांनी 'भोवऱ्यात सापडलेला कलावंत' असे मत व्यक्त केले आहे. अशी

त्यांच्या विषयाची मते कशी चुकीची आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न म. द. हातकणंगलेकर यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून केला असल्याचे दिसून येते. याच आपल्या संपादकीयाच्या अखेरीस जी.एं. च्या आक्षेपकांना प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी उत्तरे दिली आहेत. जी.एं. नी आपल्या कथाविश्वलेखनामध्ये जे सर्वसामान्य-अतिसामान्य माणसांची आयुष्ये उलघडली आहेत, ती त्यांच्या जीवनातील दारिद्र्य, भणंगपणा आयुष्यातील मुलभूत मानवी प्रश्नांचे दर्शन घडवणारी आहेत. त्यांच्या कथेतील माणसे ही सामान्य आहेत. त्यांचा समरप्रसंगात आणि संघर्ष श्रेणीत श्रेष्ठ मानवी शक्तिंची आदर्शरूपे जी दिसून येतात तीच म.द. हातकणंगलेकरांनी या ग्रंथाच्या माध्यमातून साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जी.ए. यांच्या कथेत सामाजिक आशय कमी असतो किंवा असत नाही या त्यांच्यावरील आरोपाला म.द. हातकणंगलेकरांनी याच पुस्तकामध्ये समर्पक उत्तर दिले आहे. ते म्हणतात, ''सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडवणे हा जी.एं. च्या कथांचा प्रधान हेतू नाही हे उघडच आहे. त्यांच्या या संसार कथा आहेत असे म्हटले जाते. तत्त्वज्ञानातील सारभूत अर्थाने त्या संसारकथा आहेत. केवळ लौकिक आणि सामाजिक अर्थाने त्या संसारकथा नाहीत.''[१०]

**'साहित्य सोबती'**

म. द. हातकणंगलेकर यांचा हा ग्रंथ १९९७ साली प्रकाशित झालेला आहे. म.द. हातकणंगलेकरांना त्यांच्या आयुष्यात अनेक देशी, परदेशी अशा साहित्यिक मित्रांची साथ-सोबत लाभलेली आहे. असे असतांनाही मातृभाषेवर असणाऱ्या प्रेमामुळे त्यातील मराठी साहित्यिकांशी त्यांचा स्नेह हा अधिक जडलेला दिसतो. त्या मराठी साहित्यिकांच्या साहित्याने हातकणंगलेकरांना वेळोवेळी आनंद दिलेला आहे. त्यामध्ये असणाऱ्या चांगल्या आणि श्रेष्ठ साहित्याचे गुणविशेष हातकणंगलेकरांनी वेळोवेळी आत्मसात केलेले आहेत. वेळोवेळी त्या साहित्यिकांशी झालेल्या असंख्य भेटीमध्ये साहित्य आणि साहित्यिक यांच्याविषयी अनेक अंगानी चर्चा केलेली आहे. अशा चर्चातून 'रंजन' आणि 'उद्‌बोधन' अशा दोन्हीही गोष्टी साध्य झाल्या असल्याचे दिसते. अशा वेळोवेळी होणाऱ्या चर्चांविषयी जे लेख म.द. हातकणंगलेकरांनी लिहिलेले आहेत ते लेख या संग्रहात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या 'साहित्यसोबती' मुळे त्या साहित्यिक मित्रांचे जीवन ही समृद्ध झाले असे म्हणता येईल.

**'ललित शिफारस'**

हे म.द. हातकणंगलेकर यांचे साहित्यिक सदर १९९० साली प्रकाशित झालेले आहे. हे ही निर्भेळ चिंतनपर साहित्यसदर आहे. हे सदर मार्च १९७२ ला सुरू झालेले आहे. १९७२ पासून १९८७ पर्यंत पंधरा वर्षांच्या कालखंडात एकूण १२० ललित शिफारशी करण्यात आल्या होत्या. त्यापैकी चाळीस शिफारशींची निवड करून त्यांचा समावेश या संग्रहामध्ये केला गेलेला आहे. या चाळीस शिफारशीमध्ये बहुतांशी साहित्य प्रकारांचा समावेश असल्याचे आढळून येते. जसे कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी. या शिफारशीमध्ये लेखकात जुन्या-जाणत्या आणि नवोदित जाणत्या अशा लेखकांचा अंतर्भाव दिसून येतो. जसे या शिफारशीकारामध्ये दुर्गा भागवत, गो. म. कुलकर्णी, रेखा इनामदार अशा लेखकांच्या लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या शिफारशीकडे तपशीलात पाहिजे तर असे ध्यानात येते, की केवळ ललित स्वरूपाचे काव्य, कांदबरी, कथा, नाटक या साहित्य प्रकारांची आवड कमी होत आहे. किंबहुना अतिपरिचित झाल्याने थोडी त्या साहित्य प्रकारांशी अवज्ञा झाली असेल असे वाटते. प्रत्यक्ष जगणे आणि जगत असताना त्यासंबंधी उमटलेल्या प्रतिक्रिया या दोहोंकडे जीवनाच्या तटस्थ बिंदूवरून पाहात असताना मनात निर्माण होणारी चिंतनवलये यांच्यात साहित्याची गाढ गुणवत्ता असण्याची अधिक शक्यता आहे. याची जाणीव या ललित शिफारशींच्या अभ्यासाने आपणास होते. या शिफारशींच्या संपादनाचा आशय हा प्रामुख्याने समाजाच्या सांस्कृतिक विकासाचा अगर अवनतीचा इतिहास रूढ इतिहासापेक्षा कितीतरी पटीने अधिक गुंतागुंतीचा आणि संमिश्र असतो. या बुहुमुखी इतिहासाचा भाग म्हणून अशा शिफारशींच्या दस्ताऐवजाचे महत्त्व म.द. हातकणंगलेकरांना आवश्यक वाटते.

**'वाङ्मयीन शैली आणि तंत्र'**

हा म. द. हातकणंगलेकर यांचा संपादित ग्रंथ १९९१ साली प्रकाशित झाला. हा ग्रंथ आज दुर्मिळ आहे. या संपादित ग्रंथामध्ये ज्या काळात शैलीविषयक अभ्यासाला नुकताच आरंभ झाला होता त्या काळात म.द. हातकणंगलेकरांनी वाङ्मयीन शैलीविषयक चर्चासत्र विलिंग्डन महाविद्यालय सांगली येथे आयोजित केलेले होते. हे चर्चासत्र दिनांक ९,१० व ११

जून १९७८ रोजी 'आधुनिक मराठी वाङ्मयातील शैली आणि तंत्र यांचे प्रयोगविशेष' या विषयावरती आयोजित केलेला होता. या परिसंवादामध्ये सुमारे १२ समीक्षक, आणि तीस अभ्यासक आणि रसिक यांनी भाग घेतलेला होता. या सहभागापैकी काही निवडक साहित्यिकांच्या विचारांचे संकलन म.द. हातकणंगलेकर यांनी प्रस्तुत ग्रंथामध्ये केलेले आहे. या सर्वांच्या निबंधाचा संग्रह अतिशय जबाबदारीने व साक्षेपाने म.द. हातकणंगलेकरांनी संपादीत केला आहे. शैलीविषयी आधुनिक पद्धतीने मीमांसा करणारे हे निबंध अभ्यासकांना दीर्घ काळ दिशादिग्दर्शक ठरतील असे आहेत. संकलनामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललित गद्य या विषयाच्या संदर्भात वेगवेगळ्या साहित्यिकांची मते, त्यांनी मांडलेले विचार प्रस्तुत ग्रंथामध्ये संपादित केले आहेत.

या परिसंवादामध्ये मुख्य भर होता तो बदलत्या तंत्राचा व शैलीचा शोध घेणे. हाच विषय व याच विषयावरती साहित्यिकांनी आपली मते या परिसंवादामध्ये व्यक्त केलेली दिसून येतात. यामध्ये मराठी साहित्यांच्या परंपरेत बसणारे शैलीचे प्रयोग कोणते ? उपरे कोणते? शैली कोणती? तंत्र कोणते? परंपरा समृद्ध करणारी नवता कोणती? परंपरा गढूळ व विपरीत करणारी नवता कोणती? या सर्व प्रश्नांचा अभ्यास या संपादित केलेल्या पुस्तकाच्याद्वारे आपणास शोधण्यास मदत होईल असे वाटते.

या परिसंवादामध्ये सहभागी असलेल्या समीक्षक, अभ्यासकापैकी या ग्रंथामध्ये ज्यांच्या लेखांचा समावेश आहे, त्यामध्ये **कवितेविषयी**- सुधीर रसाळ, निशिकांत मिरजकर, र. कृ. जोशी, सुहास वासुदेव मेहेंदळे, **कांदबरीविषयी**- भालचंद्र नेमाडे, कमलाकर दीक्षीत, **कथेविषयी**- द.भि. कुलकर्णी, रा.ग. जाधव, **नाटकाविषयी**- पुष्पा भावे, **ललितगद्य विषयी** - आनंद यादव या साहित्यिकांच्या विचारप्रवर्तक लेखांचा समावेश असलेला दिसून येतो.

**'साहित्यविवेक'**

म.द. हातकणंगलेकरांचा हा समीक्षा ग्रंथ १९९७ साली प्रकाशित झालेला आहे. त्यापूर्वीच्या दहा बारा वर्षात लिहिलेल्या साहित्यविषयक लेखांपैकी काही निवडक लेखांचा हा संग्रह आहे. या ग्रंथामध्ये असलेले लेख एकाच साहित्य प्रकारातले नसून ते निरनिराळ्या साहित्य प्रकारातले आहेत. यामध्ये काही पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना आहेत, काही भाषणे आहेत, काही चर्चासत्रांसाठी लिहिलेले निबंध आहेत, तर काही टिपणे व पुस्तक परीक्षणे आहेत. मात्र

हे सर्वच लेख 'साहित्यविषयक' आहेत. याबरोबर निरनिराळ्या प्रसंगाच्या निमित्ताने एकाच लेखकाच्या साहित्याविषयी काही लेख आहेत. यामुळे त्यांच्यामध्ये थोडी पुनरावृत्ती आल्यासारखी आपणास दिसून येईल. यासर्व लेखामध्ये जसा आस्वादाचा थोडा-अधिक भाग असला तरी विश्लेषणाचाही भाग असलेला दिसून येतो. या सर्व माहितीच्या आधारे साहित्यातील असणारा विवेक शोधता येतो का ? ते पाहाण्याचा प्रयत्न म.द. हातकणंगलेकरांनी केल्याचे दिसून येते. यामुळेच या ग्रंथास 'साहित्यविवेक' असे नाव दिलेले असावे असे वाटते.

या 'साहित्यविवेक' समीक्षा ग्रंथामध्ये तीन भाग करण्यात आलेले आहेत.

यामधील पहिल्या भागात सैध्दांतिक स्वरूपाचे लेख आहेत. जसे '१९६० नंतरची लोकप्रिय कादंबरी', 'आजची मराठी भाषा आणि साहित्य', 'आस्वादक समीक्षेची कैफियत' इत्यादी. याचसारखे आणखीही काही विषय आलेले आहेत.

दुसऱ्या भागात प्रामुख्याने पुस्तकांची परीक्षणे आलेली आहेत. उदा. भालचंद्र नेमाडे यांचे 'कोसला', रंगनाथ पठारे यांचे 'चक्रव्यूह', 'ताम्रपट', दुःखाचे श्वापद' या कादंबऱ्यावरील परीक्षणे दिलेली आहेत.

तिसऱ्या भागात काही साहित्यिकांचा अभ्यास म.द. हातकणंगलेकर यांनी केलेला दिसून येतो. उदा. 'माडगूळकरांचे साहित्य', 'पानवलकरांची कथा', यासारख्या विषयाबरोबर कथा संग्रहावरही परीक्षणे आलेली आहेत.

'साहित्यविवेक' या ग्रंथातील लेखांतून आजच्या मराठी साहित्यातील प्रवाह आणि प्रश्न, साहित्यविचारात पडलेली भर, नामवंत लेखकांच्या साहित्याचे स्वरूप आणि मूल्यमापनाची कल्पना इत्यादी घटकांची माहिती या ग्रंथाच्या आधारे अभ्यासकास मिळविता येते.

**'जी.एं. ची निवडक पत्रे'**

११ डिसेंबर १९८७ रोजी जी.ए. कुलकर्णी यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या साहित्यावर नितांत प्रेम करणाऱ्या अनेक रसिकांना व सुहृदांना तीव्रपणे असे वाटले, की जी.एं. ची पत्रे उपलब्ध झाली तर त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर व साहित्यावर प्रकाश पडेल आणि त्या पत्रांचा साहित्याच्या अभ्यासकांना उपयोगी होऊ शकेल. या विचारातून जी.एं. यांनी त्यांच्या सहवासामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तिंना लिहिलेली पत्रे एकत्र करून त्याचे

15433

संपादन केले आहे. या जी.एं. च्या पत्रांची संख्या बरीच असल्याने त्याचे चार खंडामध्ये प्रकाशन केलेले आहे.

त्यातील पहिला खंड १० जुलै १९९५ रोजी प्रसिद्ध झाला. जी.एं. च्या सुमारे दहा वर्षांच्या काळात सुनीता देशपांडे यांना जी पत्रे लिहिली त्या पत्रांपैकी काही निवडक पत्रांचा समावेश या पहिल्या खंडामध्ये केला गेलेला आहे.

दुसरा खंड १० जुलै १९९८ रोजी प्रसिद्ध झाला आहे. या दुसऱ्या खंडामध्ये जी.एं. नी 'सत्यकथा' व 'मौज' या दोन नियतकालिकांच्या संपादकांशी म्हणजे श्री. पु. भागवत व राम पटवर्धन यांच्याशी जी.ए. कुलकर्णी यांचा जवळ-जवळ तीस वर्षे पत्रव्यवहार सुरू असलेला दिसून येते. या तीस वर्षामधील पत्रव्यवहारातील क़ाही निवडक पत्रांचा समावेश या खंडामध्ये आलेला आहे.

तिसरा खंड १० जुलै २००६ रोजी प्रसिद्ध झाला. या तिसऱ्या खंडामध्ये जी.एं.नी विविध क्षेत्रातील व्यक्तिंना लिहिलेल्या पत्रांपैकी काही निवडक पत्रे एकत्रित केली गेलेली आहेत. या खंडामध्ये पत्रांची रचना मराठी मुळाक्षरांच्या क्रमानुसार करून 'सुभाष अवचट' ते 'जयवंत दळवी' यांच्यापर्यंत अनेकांना जी.एं. नी लिहिलेल्या पत्रांचा त्यात अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

चौथा खंड १० जुलै २००६ रोजी प्रसिद्ध झाला. या चौथ्या खंडामध्ये तिसऱ्या खंडासाठी संकलीत केलेली, मात्र त्या खंडाची पृष्ठ संख्या अधिक होते म्हणून शिल्लक राहिलेल्या पत्रांचा समावेश करून हा चौथा खंड प्रसिद्ध केलेला आहे. म्हणजेच हा चौथा खंड तिसऱ्या खंडाचा दुसरा भाग आहे, असे वाटते. या खंडामध्ये 'वा.चि.देवधर' ते 'म.द.हातकणंगलेकर' यांना लिहिलेल्या पत्रांना समाविष्ट केले आहे.

जी.एं. नी आपले साहित्य प्रसिद्ध व्हावे अशी भूमिका इतर काही लेखकाप्रमाणे मुलाखतीतून अथवा लेखातून सहसा व्यक्त केलेली नाही. त्यांच्या विपूल अनौपचारिक व विश्रब्ध पत्रांतून मात्र ती वेळोवेळी जी. ए. कुलकर्णी यांनी मांडलेली आहेत. हे या पत्रांचा अभ्यास करताना जाणवते. जी.एं. नी ही आपली पत्रे आपल्या वाचक सुहृदयांना अनौपचारिक व विश्रब्ध वृत्तीने लिहिलेली आहेत असे दिसून येते. या पत्रांच्या अभ्यासाने त्यांचे साहित्य व त्यांच्या मनातील

साहित्यनिर्मितीची प्रक्रिया, त्याचप्रमाणे त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व व मानवी जीवनाविषयी जाणीव यांचे सूक्ष्म आकलन होऊ शकते. मात्र एक व्यक्ती म्हणून त्यांच्या स्वभावाबद्दलची अतिशय वेगवेगळी मते ऐकावयास मिळतात. ती या पत्रांच्या अभ्यासातून आपणासमोर उभी राहतात, असे दिसून येते. आपले व्यक्तिगत जीवन खासगी राहावे ते सार्वजनिक होऊ नये यासाठी ते कमालीचे दक्ष राहाताना दिसून येतात. एका पत्रात म.द. हातकणंगलेकर यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त केलेला दिसून येतो. जी. ए. लिहितात, "I am very deeply thankful to you for your telegram of congratulations. This sounds very routine and worn out but please believe me, this time I mean very word of the above. I had always known that by the side of that learned (and inexcusably, inhumanly impartial) Critic in you there was always a kind hearted friend & could wink at the shortcomings of others, and be pleased with their small virtues and successes. Not that I am completely at ease even now, take it, but for God's sake, do not forget that it is not an award, but a gift, and that you do not deserve it at all." [१०]

या चारही पत्राचे खंड 'मौज प्रकाशन गृह' ने प्रकाशित केलेले आहेत

**'साहित्य-सोबती'**

या छोटेखानी पुस्तकांतून त्यांनी साहित्यिक मैत्र जसे जपले आहे, तसेच त्या लेखक मित्रांच्या साहित्याचे आकलनही उलघडून दाखवले आहे.

**'मरण आणि वेलबुट्टी'**

त्यांचे सर्वप्रथम प्रसिद्ध झालेले अतिशय छोटेखानी पुस्तक सध्या दुर्मिळ आहे. त्याचे शिर्षक आहे 'मरण आणि वेलबुट्टी.' या पुस्तकामध्ये त्यांनी बाबूराव बागूल, विद्याधर पुंडलिक, बा.सी.मर्ढेकर, चि.त्र्यं. खानोलकर, दिलीप पुरूषोत्तम चित्रे, वामन इंगळे, श्री. दा. पानवलकर, पु. शि. रेगे व ए. वि. जोशी इ. महत्त्वाच्या साहित्यिकांच्या साहित्यांची मुक्तपणे चर्चा 'मरण आणि वेलबुट्टी' या लेखांमध्ये मांडली आहे. म.द. हातकणंगलेकरांच्या पत्नीचे चार ऑपरेशन्स्

झाली. या ऑपरेशनच्यावेळी म.द. हातकणंगलेकर आपल्या पत्नीच्या अंथरूणाशेजारी बसून राहत. त्यांची पत्नी मरणाच्या दारामध्ये उभी होती. अशा परिस्थितीमध्ये असताना म.द. हातकणंगलेकर यांनी उत्तम समीक्षा लेख असलेल्या या ग्रंथाचे लेखन केले आहे. या पुस्तकाची ही जन्मकथा त्यांच्यातील चिंतनशील आस्वादक समीक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देते.

वेगवेगळ्या वृत्तीप्रवृत्तीच्या कथा लेखकांच्या निर्मितीतील विविधता न्याहाळताना; या कथालेखकाबरोबर मराठीतील अनेक कथालेखकांचा उल्लेख करीत नवकथा व त्यानंतरची कथा यामधील नाते उलगडतात. असे नाते उलगडत असताना तत्कालीन मराठी कथेचा पटही म. द. हातकणंगलेकरांनी या लेखात मांडलेला आहे. हा कथापट मांडताना १९६० ते ६५ पर्यंतच्या मराठी कथेचे श्रेय त्यांनी मान्य केले आहे. तांत्रिक कसरतीच्या व मनोविच्छेदनाच्या अतिरिक्त सोसाने विरविरीत पडणारी कथा आज नवे चैतन्य घेऊन उभी राहत आहे. असे वर्तमानकाळातील कथाविश्वाचे सार्थ वर्णन या लेखांत आले आहे.

या लेखामध्ये ज्या कथालेखकांचा समावेश केलेला आहे त्या कथा लेखकाविषयी म. द. हातकणंगलेकर सांगतात. बाबुराव बागूल व दिलीप चित्रे या दोन्ही कथालेखकांच्या कथा लेखनाचा आशय आणि त्यांचे विषय 'माणसाचे मरण' हा आहे. असा विषय दोन्हीही कथा लेखकांचा असला तरी त्यामध्ये भिन्नता असलेली जाणवते. जसे दिलीप चित्रेंना दिसणारे मानवाचे मरण हे सर्वसामान्यांना दिसणारे व व्यथित करणारे मरण नाही. तर ते अमर्याद 'जणसमूहाचे मरण' आहे असे ते सांगतात. असा भेद जरी त्यांनी केला असला तरी दिलीप चित्रे आणि बाबुराव बागूल यांच्या कथाआशयामधील 'माणसांची मरणे' ही महत्त्वाची आहेत अशा धारणेतून म.द. हातकणंगलेकरांनी या कथाकारांचे लेखन न्याहाळलेले दिसून येते.

याव्यतिरिक्त उरलेल्या कथाकार विद्याधर पुंडलीक, चि. त्र्य. खानोलकर, पु. शि. रेगे, ए. वि. जोशी, श्री. दा. पानवलकर या कथाकारांच्या कथेमध्ये येणारी कथालेखनातील 'कलात्मकतेला' त्यांनी सुजाण असा प्रतिसाद दिला आहे. आस्थाशील वृत्तीने असा प्रतिसाद देत असताना या कथाकारांच्या कथाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या ज्या प्रतिक्रिया या लेखात आल्या आहेत त्याही वाचनीय आहेत. " बागूलांच्या कथा एकांगी, बेभान आकारहीन होत जातात हे खरे, पण त्या केवळ अतिरंजित व प्रचारकी आहेत असे म्हणता येत नाही. त्यांची आजची

कथादेखील अस्ताव्यस्त पण जितीजागती आहे. यात शंका नाही.''[११] असे बागूलांच्या कथेविषयी आपल्या या लेखात म. द. हातकणंगलेकर आपले मत मांडतात.

तर दिलीप चित्रेंच्या कथांविषयी आपले मत मांडताना ते सांगतात, ''चित्र्यांची कथा तिच्या संवेदन रीतीने आर्त झालेली आहे. आविष्कार पद्धतीमुळे वेगळी वाटणारी, शब्दांचा रहस्यभेद करणाऱ्या भाषेमुळे बिचकवणारी, पण तरीही लक्ष खिळवून ठेवणारी अशी ही निष्ठापूर्ण तपश्चर्या तप्त नवकथा.''[१२] अशी प्रतिक्रिया दिलीप चित्रेंच्या कथाविषयी त्यांनी दिली आहे.

तर पानवलकरांच्या कथाविषयी आपल्या लेखात ते सांगतात.

''आजच्या जीवनातील विफलता आणि पोरकेपणाच पानवलकर मांडीत आहेत... जोरदार घटनाप्रधान कथांशी त्यांच्या कथेचे नाते आहे. त्यांच्या संवेदनाप्रवाही कथादेखील त्यातील भाषेच्या अंत:स्थ जोमामुळे घटनात्मक कथेचा अनुभव देतात... एकूण पानवलकर आज एक अनोखे, पहाडी, आशयघन, आणि शैलीच्या दराऱ्याने बांधून ठेवणारे कथाशिल्प घडवीत आहेत यात शंका नाही.''[१३] हे श्री. द. पानवलकरांच्या कथेचे वेगळेपण जाणवते असे ते म्हणतात.

तर विद्याधर पुंडलीकांच्या कथांविषयी आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, ''पुंडलीक हे नवकथाकार असले तरी अतिपरिचित होऊ पाहाणाऱ्या कलार्ततेचा त्यांना सोस नाही. त्यांच्या आविष्कारात विभ्रमात शांत तेज आहे. कोरड्या, तटस्थ, व्याजशास्त्रीय विच्छेदनवृत्तीचा आढळ तेथे होत नाही. भडक देखाव्याने लक्ष वेधण्याचा हट्ट न करता भावसूक्ष्मतेत दंग होणारी त्यांची वृत्ती मराठी कथेत नाविन्याचे एक स्वतंत्र रूप घेऊन अवतरते.''[१४]

अशा शब्दांत पुंडलिकांच्या कथाविषयी या लेखात आपले मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**'प्रेमानंद गज्वी यांच्या निवडक एकांकिका'**

म. द. हातकणंगलेकरांच्या या पुस्तकास प्रदीर्घ अशी प्रभाकर पाध्ये किंवा जी.ए. कुलकर्णी यांच्या पुस्तकासारखी प्रस्तावना नसली तरीही एकांकिकेची निवड करताना म. द. हातकणंगलेकरांनी निश्चितच एक संपादक म्हणून आपली भूमिका ठेवलेली आहे.

प्रेमानंद गज्वीचे संवाद आक्रस्ताळे नाहीत. पण निश्चयाने आत शिरणाऱ्या काळसुत्राच्या फळासारखे ते आत घुसत राहतात. कोणताही तपशीलाचा पसारा न मांडता ते आपले यातनाकांड अल्पाक्षरी धारधार शस्त्राने रूतवीत राहातात. या आशयाचा यापेक्षा अधिक विस्तृत अधिकारी असू

शकतो; पण तो अधिक परिपूर्ण असेल असे नाही.

**'श्री. दा. पानवलकरांच्या निवडक कथा'**

श्री. दा. पानवलकरांच्या निवडक कथांचे जे संपादन म. द. हातकणंगलेकरांनी केले आहे, ते 'साहित्य अकादमी' साठी केले होते. पानवलकरांच्या अनेक कथांत त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील अनेक संदर्भ गुंतलेले आहेत. असे असतानाही या अंतरंग कोशाची पूर्ण प्रतिष्ठा राखताना म. द. हातकणंगलेकर यांनी अत्यंत संयमाने केवळ काहीच पदर उलगडत त्यांच्या या कथांचे संपादन या निवडक कथासंग्रहामध्ये केलेले आहे. पानवलकरांची कथा रांगडे, पुरूषी आयुष्य जगणाऱ्या माणसांचे जीवनपट ठळक घटनांतून आणि दमदार भाषेतून उलगडण्याचा प्रयत्न करते. परिस्थितीने वाकविले तरी तोंडात झणझणीत शिवी ठेऊन आणि लाथ मारून मस्तीत कोसळण्याची या माणसांची तयारी असते. ही माणसे मनाच्या ऐरणीवर तडातड आघात करून काठिण्याचे कवच घडवू लागतात. यातून पाणवलकरांची भाषा आणि त्यांचे कथानायक यांचे लघलखते विश्व म. द. हातकणंगलेकर उभे करतात.

**'उगवाई'**

म.द. हातकणंगलेकर यांनी स्वतंत्रपणे केलेले सर्वात महत्त्वाचे संपादन म्हणजे 'उगवाई' हे मासिक होय. हे मासिक त्यांनी 'श्री. वसंत वणकुंद्रे' यांच्या सहकार्याने चालविले. या मासिकाचा पहिला अंक १९८८ साली प्रकाशित झालेला आहे. हा पहिला अंक 'जी. ए. कथाकार आणि माणूस' अशा शिर्षकाचा विशेषांक म्हणून प्रसिद्ध झालेला होता. या विशेषांकास त्या वर्षीचे सर्वोत्कृष्ठ दिवाळी अंकाचे पारितोषिक मिळाले होते.

'उगवाई' या मासिकामधून समाजातील ज्वलंत विषयाचे विचार समाविष्ठ करण्यात आले आहेत. जसे 'भारतीय उद्योगधंदे', 'साहित्य संमेलनातील निवडणुकीचे स्वरुप', 'दलित साहित्याचा आढावा', 'भारतीय साहित्य व परदेशी साहित्य' अशा विषयावर किंवा मुद्यांची चर्चा 'उगवाई'या आडगावातून निघणाऱ्या मासिकात केलेली आहे.

म.द.हातकणंगलेकर एक समतोल आस्वादक आणि साक्षेपी समीक्षक म्हणून आपणासमोर उभे राहतात. पण आस्वादक आणि समीक्षक याबरोबर एक ललित लेखक म्हणून म.द. हातकणंगलेकर आपणासमोर उभे राहतात ते त्यांच्या 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहामुळे.

या पुस्तकामध्ये त्यांनी आपल्या जीवनाभोवती सातत्याने प्रवाहासारखे फिरत राहणाऱ्या व्यक्तिंची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्या व्यक्तिचित्रणाच्या लेखनातून एक ललित लेखक म्हणून म.द. हातकणंगलेकर यांच्याकडे आपणास पाहता येते. तत्पूर्वी 'उघडझाप' या वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथांची प्रयोगशिलता समजावून घ्यावयाची आहे, तसा प्रयत्न पुढील भागात केला आहे.

## २.४ 'उघडझाप ग्रंथाची प्रयोगशीलता'

एक ज्येष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकरांचे व्यक्ती म्हणून समाजाशी असणारे नाते त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आपणासमोर उभे केलेले आहे. त्याबरोबरच आपल्या प्रदीर्घ अशा ८१ वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांच्या हातून जी साहित्याची सेवा घडलेली आहे, त्याचाही आपण धावता आढावा पाहिलेला आहे. यापुढील भागात एका समीक्षकाबरोबर ललित लेखक म्हणून म. द. हातकणंगलेकर आपणासमोर उभे राहतात, ते त्यांच्या 'उघडझाप' या पुस्तकामुळे. यापुढील भागामध्ये आपणास'उघडझाप' या ललित पुस्तकाची प्रयोगशीलता अभ्यासावयाची आहे.

अशी प्रयोगशीलता अभ्यासत असताना ज्या समीक्षकांच्या दृष्टीने म.द.हातकणंगलेकरांनी इतरांच्या ग्रंथसंपदेकडे पाहिले तीच समीक्षकांची नजर आपल्याही जीवनाकडे डोकावत असताना तशीच तटस्थ राहाते, की कुठे पाझरत रहाते, हे आपणास पाहायचे आहे. लेखक आपल्या जीवनाचा गोषवारा वाचकांबरोबर, समाजासमोर उभा करताना एका निर्लेपी समीक्षकाची दृष्टी कुठे डळमळीत ठेवतो काय? या ही गोष्टीचा अभ्यास आपणास करावयाचा आहे.

म. द. हातकणंगलेकर यांचे 'उघडझाप' हे पुस्तक 'चरित्र-आत्मचरित्र' किंवा 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारापेक्षा भिन्न अशा स्वरूपाचा एक वेगळा प्रयोग आहे. हीच याची प्राथमिक प्रयोगशीलता आहे, असे वाटते. हा वेगळा वाटणारा प्रयोग म्हणजे 'आठवणी संग्रहाचा.' हा वाङ्मय प्रकार वरवर पाहता अनिल अवचटांच्या 'स्वत:विषयी' या पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या ग्रंथसारखा जाणवतो. पण खूप खोलवर पाहीले तर 'एकोऽहं बहू स्याम्' अशा वचनाचा येथे प्रत्यय येतो.

'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारांच्या लिखानाला एक अलिखित नियमावली किंवा मर्यादा असते. नियमांच्या किंवा बंधनाच्या चाकोरीमध्ये स्वत:ला बंदिस्त करून त्याचा लेखक हा लेखन करीत असतो. जसे चरित्रकार हा चरित्रवाङ्मयाचे लेखन

करताना ज्या व्यक्तिचे चरित्र तो मांडणार असतो त्याचे यथापूर्ण चित्रण तो करू शकेल असे ठाम सांगता येत नाही. कारण चरित्र लेखकास दुसऱ्याविषयीची परीपूर्ण माहिती असेलच असे नसते. यामुळे त्या व्यक्तिंचा तो परिपूर्ण असा जीवनपटाचा इतिहास असेल असे आपणास सांगता येत नाही. तसेच या चरित्राची लेखन पद्धती ही सुरूवातीस त्या चरित्र नायकाचा जन्म, त्याचे बालपण, त्याचे शिक्षण, त्याचा व्यवसाय किंवा नोकरी, त्याने केलेले वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्य, त्याचे वृध्दत्व व त्याचा मृत्यू अशा कालक्रमिक अलिखित नियमांशी ते बांधले गेलेले असते.

ज्या पद्धतीने चरित्रकाराला दुसऱ्याविषयी परिपूर्ण माहिती असतेच असे नाही, त्याचप्रमाणे 'आत्मचरित्र' लिहिणारा आत्मचरित्रकार हा आपल्या जीवनामध्ये घडलेल्या प्रत्येक गोष्टींचे तो आपल्या लेखनाच्या माध्यमातून वाचकासमोर, समाजासमोर उभा करेलच असे सांगता येत नाही. कधीकधी त्याच्या जीवनामध्ये घडलेल्या काही घटना या मांडता-मांडता पाझरतात. या घटना कधीकधी जाणिवपूर्वक तर कधीकधी अजानतेपणी त्याच्याकडून नमूद करावयाच्या राहतात. किंवा सामाजिक व नैतिक अशा अडचणीमुळे त्या मुद्दामहून गाळलेल्या असतात. अशा आत्मचरित्राचे लेखन करीत असताना त्याने ज्या परिस्थितीत, व्यक्तिच्या सहवासामध्ये आपले जीवन व्यथीत केलेले असते त्यांचे वर्णन त्यामध्ये येईलच असे नाही.

मात्र या आठवणी संग्रहाचे लेखन करताना अशा लेखनास वाङ्मय प्रकाराला कोणतीही क्रमबद्धता नसते. डोळ्यासमोर ज्या ज्या वेळेस जी जी व्यक्ती उभी राहते त्या व्यक्तिंच्या जीवनचरित्राबरोबर लेखक आपली जीवनकथा उभा करण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा व्यक्तिमध्ये त्याचे स्नेही, आप्त, मित्र, गुरूजन, कुटुंबिय असे कोणीही असू शकते. त्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये लेखकाचे जीवन गुंतलेले असते. अशा आठवणी संग्रहाचे लेखन म्हणजे त्याच्या जीवनाचा गुंतलेला जीवनाचा गुंता तो वाचकासमोर सोडवण्याचा प्रयत्न करीत असतो.

अशा प्रकाराच्या घाटावर आधारीत म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या प्रदीर्घ अशा ७५ वर्षाच्या आयुष्यामध्ये, सर्जनशील समीक्षक व मितभाषिक स्वभावाचा पण माणसातील चांगुलपणावर प्रेम करणारा माणूस म्हणून जगत असताना जे सुख, दुःख, जी माणसे, जे प्रसंग, अनुभव, घटना त्यांच्या वाट्याला आले ते त्यांनी 'उघडझाप' या आपल्या आठवणी संग्रहाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे वेळोवेळी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. म.द.हातकणंगलेकरांनी

आपल्या डोळ्यासमोर ज्या ज्या वेळेस ज्या ज्या व्यक्तिची प्रतिमा उभी राहील त्या त्या वेळेस त्यांनी ते लिखान स्फुट लेखांच्या स्वरूपात १९९५ पासून लिहिलेले आहे. असे त्यांनी लिहिलेले लेख हे त्या त्या वेळेस वेगवेगळ्या अंकातून प्रकाशित झालेले आहेत. तर कधी ते लेख अप्रकाशित राहिलेले दिसून येतात. अशा लिखानासाठी त्यांना 'चरित्र-आत्मचरित्रा'सारखी बंधने किंवा नियम आपल्या कडामध्ये जखडून ठेवत नाहीत. त्या बंधनांना झुगारून देऊन म.द. हातकणंगलेकरांनी एका नव्या लेखनाचा प्रवाह मराठीत आणला. असे म्हणावे लागेल. म.द. हातकणंगलेकरांनी आपल्या जीवनातील नेमक्या घटना, प्रसंग व व्यक्ती या 'आठवणी' संग्रहातील लेखामधून मांडलेल्या आहेत. त्याच्या माध्यमातून त्यांचे वर्णन करीत करीत आपल्या जीवनाचा चित्रपट वाचकासमोर, समाजासमोर त्यांनी उभा केलेला आहे. या त्यांच्या लेखनाच्या आधारे वाङ्मयीन जाणिवा विकसित होऊन प्रगल्भ परिणत रसिक, अभ्यासक, कलावंत समीक्षक व एक ललित लेखकाचे व्यक्तिमत्त्व कसे बनले त्याचा आलेख म्हणजे 'उघडझाप' हा आठवणी संग्रहाचा ग्रंथ होय.

या आठवणींच्या संग्रहामध्ये म. द. हातकणंगलेकरांनी आपल्या जीवनातील अनेक आठवणींना वेगवेगळी शीर्षके दिलेली आहेत. अशा आठवणींच्या संग्रहाचे हे पुस्तक आपणासमोर साकारलेले आहे. प्रत्येक आठवण शीर्षकाने बंदिस्त केलेली आहे. या आठवणी संग्रहाविषयी प्रा. तानाजी पाटील म्हणतात,

''म. द. हातकणंगलेकरांचा जन्म हातकणंगले या पेट्याच्या गावी शेतकारी कुटुंबात झाला. त्यांचे वडील उत्तम शेतकरी होते. त्यांची शेतमळ्याची शेती होती. तिच्याशी त्यांचा संबंध आला. त्यामुळे गाव, शेती, ग्रामीण माणूस तेथील संस्कृतीचा जिव्हाळा त्यांच्या ठिकाणी एकवटलेला जाणवतो. घरातील माणसांची उबदार माया त्यांनी अनुभवली. घरच्या भाजी भाकरीची वेगळीच चव आजही त्यांना आठवते. त्यांच्या मळ्यात चालणाऱ्या गुऱ्हाळाचे तपशिलवार चित्रण त्यांनी केले आहे. गावातील अनेक घटना, व्यक्ती, प्रसंग, गावची रचना या सर्व गोष्टी अत्यंत सहज स्वाभाविकपणे त्यांनी मांडल्या आहेत. म.द.हातकणंगलेकरांनी व्यक्तिरेखाटनाला विशेष महत्त्व दिले आहे. त्यांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याच्या व्यक्तिंची शब्दचित्रे त्यांनी रेखीवपणे उभी केली आहेत. त्याबरोबर त्यांचे मित्र, वाङ्मय क्षेत्रातील साहित्यिक,

कलावंत, मित्रांचीही व्यक्तिचित्रे त्यांनी शब्दबद्ध केलेली आहेत.'' [१५] 'तरीही एक प्रयोगशीलता म्हणून 'उघडझाप' हा ग्रंथ तपासत असताना असे दिसते की, हे पुस्तक म्हणजे एक 'लोलक' आहे. आणि या लोलकातून म. द. हातकणंगलेकर रूपी प्रकाशकिरण आरपार गेल्यावर त्यातून जीवनात भेटलेली अनेक व्यक्तित्वे इंद्रधनुष्यासारखी नानारंगांनी उजळून निघतात. त्याचे आकार, विकार, प्रकृतीधर्म या साऱ्यांची एक अनेकरंगी पण मूलत: माणूस म्हणून एकरंगी अशी अंतिमत: स्वच्छ दिसू लागते. याचे कारण यातील प्रत्येकरंगी व्यक्तिवर जी नजर रोखलेली आहे. ती म. द. हातकणंगलेकर यांच्या जीवनविषयक दृष्टीकोनाची.' हीच या आत्मपर आठवणी संग्रहाची प्रयोगशीलता आहे.

## २.५ उघडझाप मधील व्यक्तिदर्शन व प्रवृत्तीदर्शन

'उघडझाप' मध्ये म.द. हातकणंगलेकरांनी गेल्या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातील घटनाक्रम अधोरेखित केलेला आहे. एवढ्या प्रदीर्घ कालखंडातील घटनाक्रमाला मूर्त रूप देत देत आपल्या जीवनाचा प्रवास त्यांनी मांडलेला आहे, त्याचा संमिश्र आढावा आपणास देता येईल. या त्यांच्या जीवनप्रवासाबरोबर एक कलावंत समीक्षकाचा जीवनाचा प्रवास कसा विकसित होत जातो, याचा उलघडाही या ग्रंथातून वाचकास होतो.

प्रत्येक मानवाला त्याच्या उतारवयामध्ये आनंद आणि आधार देण्याचे कार्य त्याच्या भूतकाळामध्ये घडलेल्या गोष्टी व बालपणातील अनेक आठवणींचा गोडवा सहाय्य करीत असतो. अशा बालपणाच्या स्मृती प्रत्येकाच्या मनामध्ये घर करून बसलेल्या असतात. अशाच स्वरूपाच्या म.द. हातकणंगलेकरांच्या मनामध्ये ज्या बालपणातील आठवणी आहेत, त्या त्यांनी **'हरपले श्रेय'** या लेखात नमूद केलेल्या आहेत. या लेखात त्यांनी आपणांस क्रिकेटचे वेड कसे जडले, मनामध्ये लहानपणापासून आजपावेतो अनाघ्रात वाटणाऱ्या 'जनी'चे व्यक्तिचित्र, 'गुळवे'चे एक वेगळे जग लेखकाच्या बालपणी उभे राहिलेले आहे. त्याचा जो प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतलेला आहे तो या लेखामधून हातकणंगलेकरांनी मांडलेला आहे.

**'चिमणी, सुखी रमणी'** या लेखामध्ये आपल्या मोठ्या भावाला शिकायला मिळाले नसले तरी त्याच्या मनामध्ये आपल्या लहान भावाने म्हणजे म.द. हातकणंगलेकरांनी एका चांगल्या शाळेत आपले शिक्षण पूर्ण करावे, अशी त्याची इच्छा होती. त्यासाठी त्याने वडिलाजवळ

आईजवळ हट्टही धरलेला होता. लेखकांनी आपले शिक्षण ज्या मिशनरी शाळेत घेतले त्या शाळेविषयी व त्या शाळेच्या प्रिन्सिपॉलचे व्यक्तिचित्र त्यांच्या मनाला आजही स्पर्श करीत राहते. त्यांची मूर्ती आजही लेखकाच्या नजरेसमोर उभी आहे. 'चिमणीसारखे सुखी जीवन' म. द. हातकणंगलेकरांनी जे जगले ते या लेखात मांडलेले आहे.

**'आठवणींच्या जगात'** या लेखामध्ये लेखकाच्या बालमनावर ज्या ज्या व्यक्तिंनी संस्कार केले त्यांच्याविषयीच्या आठवणी येतात. त्यामध्ये आपल्या वडिलांची आई म्हणजे लेखकाची आजी हिचा मोठा वाटा आहे. लेखकांनी तिचे व्यक्तिचित्र अतिशय परिणामकारक रीतीने रेखाटले आहे. संस्कारक्षम बालमन घडवतानाच ती लेखकावर अतोनात प्रेम करत होती.

जन्म आणि मृत्यू हा मानवी जीवनातला अविभाज्य घटक आहे. एखाद्याच्या जन्मामुळे मानव सुखावून जातो तर मृत्यूमुळे तो पूर्णतया उध्वस्त होत असतो. अशाच मृत्यूची जी साखळी लेखकांनी आपल्या आयुष्यामध्ये बालपणापासून प्रत्यक्ष अनुभवलेली आहे. त्याचे सचित्र, हृदयद्रावक असे वर्णन **'मरणसाखळी'** या लेखामध्ये केले आहे.

म.द. हातकणंगलेकरांच्या वडिलांचा मृत्यू त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात ठरणारा होता, तसाच तो लेखकाच्याही बालमनावर आघात करणारा ठरला. चांगल्या प्रेमळ आणि जिवापाड जपणाऱ्या जवळच्या माणसाच्या मृत्यूने ते हळवे बनले. या दु:खाचे तीव्र पडसाद त्यांच्या मनावर आजही उमटलेले दिसतात. वडिलांचा लाभलेला अल्पकाळ सहवास व त्या काळातील आठवणी म्हणजेच हा त्यांचा लेख होय.

याच आठवणी संग्रहामध्ये आलेली दुसरी कडी मोठ्या भावाची आहे. त्याच्या आयुष्यामध्ये त्याला अनेक संधी मिळूनही त्याने ती वाया घालवली. त्याला आपल्या आयुष्यामध्ये काहीच करता आले नाही. उलट तो व्यसनाधीन बनला. त्याला जडलेल्या अनेक व्यसनांनी त्याची जीवनज्योत कशी मालवत गेली. त्यांच्या अशा वागण्याने त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नीचे जीवनही अंध:कारमय कसे झाले. चितेच्या ज्वाळांकडे पाहताना भावाची अनेक रूपे डोळ्यासमोर कशी येत राहिली ती आजपावेतो कशी अखंड डोळ्यासमोर उभी राहातात, या सर्वांचे दु:खमय चित्रण ते वाचकासमोर मांडतात.

**'आत्ती'** म्हणजे वडिलांची बहीण. तिचे नाव 'हिरा'. नवरा वारल्यानंतर ती भावाच्या म्हणजे लेखकांच्या वडिलांच्या घरी राहात होती. त्या दिवसभर मळ्यामध्ये म्हैशीला घेऊन जात

असत. शेतातील गडीमाणसांच्यावर देखरेख ठेवीत असत. तिला स्वतःचे मूल नसल्याने तिने लेखकावरती मुलाप्रमाणे प्रेम केले होते. भावाच्या मृत्यूनंतर तिने जो हंबरडा फोडला होता तो आजही लेखकाला आठवतो.

वडिलांच्या मृत्यूनंतर म. द. हातकणंगलेकरांच्या कुटुंबाला ज्यांनी आधार दिला ते लेखकांचे **'मोठे मामा'** गणपतराव आरवाडे. मोठ्या मामांनी भागीदारीतून आपला स्वतःचा धंदा उभा केला होता. मोठ्या मामांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी आदर होता. यामुळे त्यांनी आपल्या लहान भावास एल.एल.बी. पर्यंत शिकवले. म.द.हातकणंगलेकरांना शिक्षणासाठी वेळोवेळी मदत केली. तसेच मोठ्या मामांनी काही शिक्षण संस्थांनाही भरघोस अशी आर्थिक मदत केली. असे त्यांचे उल्लेखनिय कार्य असले तरी त्यांना बाहेरचे नाद होते, हे लेखकांच्या फार उशीरा ध्यानात आले.

हातकणंगलेकरांचे **'धाकटे मामा'** म्हणजे रामभाऊ आरवाडे. अफाट बुद्धिमत्ता असणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. एल.एल.बी. पर्यंत त्यांनी शिक्षण पूर्ण केले होते. असे असतांनाही कलंदरवृत्तीने जीवन जगण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे, सातत्य आणि चिकाटीचा अभाव व व्यसनीपणामुळे त्यांच्या जीवनाला दिशा लाभली नाही. या धाकट्या मामांच्याकडून लेखकास अनेक इंग्रजी, मराठी पुस्तकांचा आस्वाद घेता आला. त्यांच्या आयुष्याचे शेवटचे दिवसमात्र हालाखीचे गेले. त्यांच्या साऱ्या जीवनाचे ओझे लेखकांच्या अंतःकरणात उतरले आहे.

निसर्गाची आवड असूनही निसर्गापासून आपण शहरी वातावरणामुळे कसे पोरके होत चाललो आहोत याचा अनुभव तासगावमध्ये असताना त्यांना आलेला होता. तो **'पानकळा'** या लेखात त्यांनी दिलेला आहे. हातकणंगले या गावामध्ये रहात असताना लहानपणी वडिलांच्या सोबत पावसाळ्याच्या दिवसामध्ये दुथडी भरून वाहणाऱ्या ओढ्याचा आनंद त्यांनी अनुभवलेला होता. असा आनंद मात्र तासगावहून परत सांगलीला येत असताना अनुभवता आला नाही. त्यांना हा आपला पराभव आहे असे वाटत राहिले. म्हणूनच ते म्हणतात की, "आपल्या जगण्याची ही दिशा काही ठीक नाही" [१६]

**'पन्नास वर्षापूर्वीचे शिक्षण'** या लेखात ते शिक्षण घेत असताना ज्या शिक्षकांचा व मित्रांचा सहवास त्यांना लाभलेला आहे, त्यातील काहींचा उल्लेख त्यांनी या लेखामध्ये केलेला

आहे. त्या प्रत्येकाचा स्वभाव, त्यांचे मन, त्यांचे व्यक्तिचित्र लेखक आपणासमोर उभे करतात.

**'विलिंग्डनचे दिवस'** या लेखात विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून ते एम.ए.ची परीक्षा देईपर्यंतचा भाग आलेला आहे. याच कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना ग्रंथालयात असणाऱ्या अनेक पुस्तकांचा आस्वाद घेता आला. वेळोवेळी प्रिन्सिपॉल पंडित, प्रा. एच.बी. कुलकर्णी, प्रा. भ. म. गोरे यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आपल्या जीवनाला कशी कलाटणी मिळत गेली या गोष्टीची कबुली त्यांनी प्रांजळपणाने दिलेली आहे. **'अर्धशतकातील स्मरणे'** या लेखात मागील पन्नास वर्षापूर्वीचा काळ व त्या पन्नासवर्षामध्ये आलेले चढउतार, जीवनामध्ये घडलेल्या चांगल्या-वाईट घटना यांचा आढावा घेतलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्वीसारखे देशातील वातावरण राहीलेले नाही. प्रत्येक क्षेत्रामध्ये गढूळता निर्माण झालेली दिसून येते. यामध्ये शासनाच्या कमिट्या, साहित्य संस्कृती मंडळ, साहित्य अकादमी, महाराष्ट्रातील विविध साहित्यिक परिषदा यांचा व्यवहार नीटपणे चाललेला नाही. यावरून शासकीय कारभार किती बेफिकीरीने चालेला असतो त्याचे चित्रण त्यांनी निर्भय मनाने केलेले आहे. असा अनुभव प्रत्यक्ष त्यांना अनुभवास आलेला आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही भारताची आहे. तिला पन्नास वर्षे होऊन गेली तरी सर्व कारभाराचा 'खेळखंडोबा' आणि 'भ्रष्टाचारा'ने सुरू आहे. म. द. हातकणंकलेकर या साऱ्या गोष्टी समाजासमोर आणू पाहतात, तेव्हा अंतर्मुख व्हायला होते.

म. द. हातकणंगलेकर आपल्या जीवनामध्ये आलेल्या आप्त, स्नेही, मित्र, साहित्यिक यांच्याविषयी लिहितात. ही गोष्ट त्यांची पत्नी म.द. हातकणंगलेकर यांना बोलून दाखवतात तेव्हा आपण पत्नीविषयी काही लिहिले नाही याची अपराधी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होते. तेव्हा आपल्या पत्नीविषयी जे थोडेबहूत लिहिलेले आहे, ते त्या अपराधाची भरपाई म्हणता येईल. या आपल्या पत्नीविषयीच्या आठवणी **'विवाह आणि कुटुंबनिरीक्षण'** या लेखात आले आहे.

**'जी.ए. नावाचं कोडं'** या आपल्या लेखात म.द. हातकणंगलेकरांनी मृदू, ऋजू, मुलायम, वक्तशीर, स्वाभीमानी असणाऱ्या जी.ए. कुलकर्णी या साहित्यिकाचा जो दीर्घकाळ सहवास हातकणंगलेकरांना लाभला, त्या सहवासामधून म.द. हातकणंगलेकरांनी जी.ए.च्या मनापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. जी.ए.चे न उलघडणारे मन म.द. हातकणंगलेकरांनी

या लेखातून जी.ए.च्या व्यक्तिमत्वावर प्रेम करणाऱ्या वाचकांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे. जी.ए.च्या लौकिक जीवनाचा संदर्भ त्यांच्या कथेत कसा व्यक्त झाला आहे याचा शोध म.द. हातकणंगलेकरांनी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्य निर्मितीवेळी जी.ए.च्या मनामध्ये जी खळबळ माजत होती त्याचाही शोध या लेखामध्ये हातकणंगलेकरांनी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रत्येक व्यक्तिला मुक्त जीवन जगावयास आवडत असते. असे मुक्त जीवन जगणारा व्यक्ती दुसऱ्यांच्या विचारांची गुलामगिरी स्विकारत नाही. मग तो आपला अधिकारी असला तरी त्याचे बंधन त्यांच्या स्वतंत्र विचारांच्या मार्गाच्या आड येत नाही. अशाच स्वतंत्र विचाराने जगणाऱ्या आपल्या मित्राचे व्यक्तिमत्व **'जगाचे बंध कोणाला'** या आपल्या लेखात त्यांनी नमूद केलेले आहे. या बंधनविरहीत जीवन जगण्याच्या स्वभावामुळे वेळोवेळी तो संकटांच्या चक्रव्युहामध्ये कसा गुरफटला जायचा, याचे चित्रण ते करतात. असे असले तरीही त्याची तमा त्याने कधीही बाळगली नाही. अशा मित्राचे चित्रण या लेखामध्ये आलेले आहे.

म.द. हातकणंगलेकर आपल्या मित्रांच्यासोबत इंग्लंडच्या प्रवासाला गेले होते. या प्रवासामध्ये त्यांना ज्या महाराष्ट्रीयन चित्रकारांची भेट झाली त्यांचे वर्णन त्यांनी **'इंग्लंडमध्ये भेटलेले मराठी चित्रकार'** या लेखामध्ये केलेले आहे. या प्रवासामध्ये लेखकांना दोन महाराष्ट्रीयन चित्रकार भेटले. त्यापैकी पहिले 'वसंत चिंचवडकर' व दुसरे चित्रकार 'माळी' या दोघांचाही स्वभाव म्हणजे दोन ध्रुवावरची दोन टोके असे भिन्न व्यक्तिमत्व लेखकांना जावणते. त्या दोन मनांची दोन टोके या लेखातून म. द. हातकणंगलेकरांनी वाचकासमोर उलघडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**'सारांशाने'** या लेखात म.द. हातकणंगलेकर यांनी आपल्या तरूण वयात वेगवेगळ्या कारणांनी आपण व्यसनाच्या वाटेवर कसे चालत गेलो त्या व्यसनाचा विपर्यास आजारपणात कसा झाला याचा तपशील वाचकापुढे ठेवतात. हा तपशील मांडताना ते कुठेही आडपडदा ठेवत नाहीत. तर मनमोकळेपणाने वाचकांशी संवाद करीत आहेत असे जाणवते.

**'जाणीव'** या आपल्या लेखात म.द. हातकणंगलेकर यांनी आपल्या जीवनामध्ये भेटलेल्या मात्र अनैतिकतेकडे झुकलेल्या, आपल्या जीवनाची वाट पादाक्रांत करत असताना घसरलेल्या काही व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले आहे. याबरोबरच या लेखाच्या दुसऱ्या भागामध्ये आपला

मुलगा प्रदीप आणि मुलगी रेवती व विश्रब्धा या तीन मुलांविषयीचा मनामध्ये असलेला प्रेमभाव त्यांनी या लेखामध्ये व्यक्त केलेला आहे. आपल्या मुलांची प्रगती हाच आपल्या उतारवयातील आनंद व आधार देणारा आहे असे ते प्रांजळपणाने नमूद करतात.

**'अमृत महोत्सव'** या लेखात आपल्या आयुष्याला जी पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने मित्र मंडळी, विद्यार्थी, साहित्यिक यांनी जो नागरी सत्कार आयोजित केला होता त्याचा गोषवारा या लेखामध्ये त्यांनी दिलेला आहे. आपले स्वत:चे दु:ख, अडचणी बाजूला ठेवून हातकणंगलेकर सरांच्यावर असलेले प्रेम म्हणून डॉ. ग.प. प्रधान, वि.रा. करंदीकर, चारूता सागर, सखा कलाल, श्री. सदाशिव अमरापूरकर, डॉ. विश्वनाथ शिंदे, इत्यादींनी हजेरी लावली याबद्दल ते या लेखाच्या शेवटी कृतज्ञता व्यक्त करतात.

**'मखमालीची लव आणि कंटकशल्ये'** या आपल्या लेखामध्ये म.द. हातकणंगलेकरांनी आपला सर्जनशील कलावंत आणि समीक्षक म्हणून जो विकास झाला त्याचा प्रवास या लेखामधून आपणासमोर ठेवतात. सुरूवातीच्या काळामध्ये त्यांनी मासिकांतून केलेले लेखन त्यांना स्वतंत्र निर्मितीचा आनंद कसा देत राहते, याचा उल्लेख ते या लेखामध्ये करतात. मराठी कथाकरांचे कथेचे केलेले इंग्रजी अनुवाद, सौंदर्यशास्त्र, कथा, कादंबरी या लांब पल्ल्याच्या क्षेत्राचा त्यांनी घेतलेला वेध तर्ककठोर न होता ती अधिक तरल पारदर्शी स्वरूपात कशी व्यक्त झाली आहे. ते या लेखातून वाचकास सांगीतलेले आहे.

**'उघडझाप'** या शेवटच्या आठवणीमध्ये आपल्या ७५ वर्षांच्या जीवनातील अनुभव व आठवणी लेखकांनी नमूद केल्या आहेत. यामध्ये वडिलांची आई, मित्राची, साहित्यिकांची, शिक्षकांची अशा वेगवेगळ्या व्यक्तिंच्या आठवणींचा गोषवारा डोळ्याची 'उघडझाप' करीत असताना जो उभा राहतो तो या लेखातून वाचकासमोर उभा केलेला आहे. अशा अनेक व्यक्तिंच्या सहवासाने लेखकाचे आयुष्य सुखदायी व समाधानी झालेले आहे. त्यासर्वांबद्दल लेखक कृतज्ञता व्यक्त करतात. या सर्वांचा धावता आढावा घेताना ते सांगतात. ''आता ढळला रे दिन सखया ढळला, संध्याछाया-भिववत नाहीत, दिसतात मात्र !''[१७]

या त्यांच्या आठवणी संग्रहाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनाकडे पाहाताना असे जाणवते, 'उघडझाप' मध्ये लेखक म.द.हातकणंगलेकर एक ज्येष्ठ समीक्षक व लेखक असल्याचा उल्लेख

कोठेही केलेला आढळत नाही. याबरोबरच आपल्याला मिळालेला साहित्याचा सन्मान, वेगवेगळे पारितोषिक याही गोष्टीचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष उल्लेख कुठेच केलेला नाही, हे विशेष लक्षणीय वाटते. यामध्येच या साहित्यिकाचे मोठेपण आपणास दिसून येते. अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व साहित्याचा गौरव करताना डॉ. रा. ग. जाधव म्हणतात.

"मर्ढेकरानंतरचा काळ हा नवकथा, काव्य, नवनव्या, समीक्षा आणि परिवर्तनाचा होता, तो लेखकांची आणि समीक्षकांची कसोटी पाहणारा होता. यात म.द.नी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. ते या काळाच्या आव्हानाला व कसोटीला उतरले आहेत. त्यांच्या समीक्षेतून, लिखाणातून शिक्षकधर्म दिसतो. नवीन लेखकांना हेरून प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी मूकपणे अव्याहत केले. हाच त्यांचा मोठेपणा आहे."[१८]

## २.६ निष्कर्ष

'उघडझाप' मधील मर्मज्ञ, प्रज्ञावंत समीक्षकाच्या जीवनाचा उंचावणारा आलेख लक्षणीय आहे. तसेच या ग्रंथाचे स्वरूप चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथा, यांच्या सीमारेषा पुसून टाकणारी ही आठवणींची साखळी आहे. या साऱ्या आठवणी 'मी' शी संबंधित आहेत. 'मी' हा 'उघडझाप'चा केंद्रबिंदू आहे. आणि त्याच्या भोवतीच्या परिघात ही सारी शब्दचित्रे व प्रसंगचित्रे वावरतात. तसेच 'उघडझाप' मधील 'मी' हा अनेकत्वाने जगतो. म्हणजे लेखक हातकणंगलेकर या 'मी' मध्ये अनेक 'मी' सामावलेले आहेत. म्हणून हे आत्मपर आठवणींचे एकजिनसी संचित आहे, असे या 'उघडझाप' चा अभ्यास करीत असताना जाणवते.

यापुढील भागात म.द.हातकणंगलेकरांच्या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ जीवनात आलेल्या व्यक्ती, त्यांचे स्वभाव व गुणदोष, त्यांची वैशिष्ट्ये, नातेसंबंधीच्या भावना, मित्र व स्नेही या सर्वांचा परिचय तसेच लेखक आणि त्यांच्या सहवासातील व्यक्तिंच्या स्वभावाचे पैलू पाहावयाचे आहेत.

★★★★★

प्रकरण दुसरे

# संदर्भ


१) सप्रे अविनाश : 'दै. तरूण भारत', दि. ०२ नोव्हेंबर, २००७.

२) कांबळे उत्तम : 'दै. तरूण भारत', दि. ०२ नोव्हेंबर, २००७.

३) पाटील तानाजी : 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' म. द. हातकणंगलेकर विशेषांक, ऑक्टोबर-डिसेंबर-२००७ पृ. क्र. १६.

४) करंदीकर वि. रा. : 'ललित (मासिक) म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. १६.

५) हातकणंगलेकर म. द. : संपादक -'विचारधारा', प्रकाशक-अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९७९.

६) हातकणंगलेकर म. द. : संपादक -'विचारधारा', प्रकाशक-अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९७९.

७) हातकणंगलेकर म. द. : संपादक -'साहित्यातील सोबती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १७ मार्च, १९८०.

८) पवार गो. मा. : दैनिक तरूण भारत, दि. ०२ नोव्हेंबर, २००७.

९) बेलवलकर सुमन : 'ललित' (मासिक) म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. ४८.

१०) खराडे बा. द. : संपादक, साप्ताहिक समाधान, म. द. हातकणंगलेकर विशेषांक, दि. १८ सप्टेंबर २००७, पृष्ठ क्र. ०३.

११) पाध्ये दिगंबर : 'ललित' (मासिक), म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. ४०.

१२) पाध्ये दिगंबर : 'ललित' (मासिक), म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. ४०.

१३) पाध्ये दिगंबर : 'ललित' (मासिक), म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. ४०.

१४) पाध्ये दिगंबर : 'ललित' (मासिक), म. द. हातकणंगलेकर विशेषांक, जानेवारी २००८, पृष्ठ क्र. ४०.

१५) पाटील तानाजी : 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', म. द. हातकणंगलेकर विशेषांक, ऑक्टोबर-डिसेंबर २००७, पृष्ठ क्र. ११.

१६) हातकणंगलेकर म.द. : 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती, १ फेब्रुवारी २००५, पृष्ठ क्र. ७६.

१७) हातकणंगलेकर म.द. : 'उघडझाप', मौज प्रकाशन, गृह खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती, १ फेब्रुवारी २००५, पृष्ठ क्र. २१५.

१८) जाधव रा. ग. : 'दै. तरूण भारत', दि. ०२ नोव्हेंबर २००७.


********